Shivaji College Hingoli Dist. Hingoli

ISSN 0976-0377
RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

(UGC Approved, Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year -VIII, Issue - XIX, Vol.- I | Impact Factor 5.85 (GRIFI) | Jan. 2019 To June 2019

JANVIKAS MAHAVIDYALAYA, BANSAROLA AND
DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHAWADA UNIVERSITY,
AURANGABAD
Sponsored
NATIONAL LEVEL CONFERENCE
ON

## "POLITICS OF DEVELOPMENT IN INDIA"




**Editor In Chief**
**Dr. Babasaheb M. Gore**

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Dist. Hingoli


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 32 | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ : एक अवलोकन<br>धर्मराज केशवराव कटके | 141 |
| 33 | शाश्वत किंवा चिरंतन विकास<br>डॉ. केशव दत्तराव तिडके | 147 |
| 34 | जागतिकीकरणाचा भारतीय समाजावर झालेला परिणाम<br>डॉ.गितांजली सदाशिवराव मोटे | 150 |
| 35 | अन्न सुरक्षा धोरण व आव्हाणे<br>जयंत हंसराज मोरे | 154 |
| 36 | सामाजिक, राजकीय, आर्थिक परिवर्तनाचे महामेरु - डॉ.बाबासाहेब आंबेडकर<br>डॉ. सुधाकर एस. हांगे | 158 |
| 37 | अन्न सुरक्षा<br>डॉ. मुक्ता सोमवंशी (गंगणे) | 161 |
| 38 | जागतिकीकरणाचा आर्थिक विकासावर झालेला परिणाम<br>शितल शामसुदर शिंदे | 166 |
| 39 | जागतिकीकरणाचा शेतीक्षेत्रावर झालेला परिणाम - एक अभ्यास<br>डॉ. सुखनंदन ढोले | 170 |
| 40 | महाराष्ट्रातील उद्योजकता विकासातील राजकिय धोरण<br>बाबुराव रामभाऊ मुंडे | 175 |
| 41 | भारतातील राज्यशास्त्राचा विकास<br>अशोक ज्ञानोबा दुनघव | 178 |
| 42 | मानवाधिकार आणि भारतीय संविधान<br>डॉ. सुहास मोराळे, महेश कांबळे | 180 |
| 43 | जागतिकीकरण आणि भारतावरील परिणाम<br>डॉ. दयानंद माधवराव गुडेवार | 184 |
| 44 | जागतिकीकरण आणि मराठी नाटक<br>डॉ. संपदा कुलकर्णी | 187 |


PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College Hingoli Dist. Hingoli

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 5.85
ISSN 0976-0377
Issue : XIX, Vol. I, Jan. 2019 To June 2019 

# जागतिकीकरणाचा शेतीक्षेत्रावर झालेला परिणाम - एक अभ्यास

डॉ. सुखनंदन ढोले
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शिवाजी महाविद्यालय,
हिंगोली

39 Research Paper - Poltical Science

**प्रस्तावना**

जागतिकीकरण हा विसाव्या शतकाच्या अखेरीचा आणि एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीचा परवलीचा शब्द आहे. संत ज्ञानेश्वरांनी विश्वबंधुत्वाची कल्पना पसायदानामधुन मांडतांना विश्वची माझे कुटूंब हा मुलमंत्र दिला तो समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी. त्यामागची भूमिका उदात्त होती. मात्र आजच्या वैश्विकरणाची कार्यपध्दती आणि भूमिका आर्थिक सत्ता संपादन करण्याची आहे. जागतिकीकरण म्हणजे व्यापार किंवा आर्थिकदृष्टया संपूर्ण विश्वात चालणे होय. त्यांना प्रदेश व राष्ट्राच्या मर्यादा नसुन एक प्रकारे जागतिक अर्थव्यवस्थेशी एकात्मतेची ती प्रक्रिया आहे.

वसाहतिक युगातच जागतिकीकरणाची पाळेमुळे रोवली गेली. परंतु त्यात वसाहतीचे शोषण हा मुद्दा महत्त्वाचा होता. १९७० च्या दशकाच्या मध्यापासून जगात नवीन प्रकारच्या श्रीमंत देशांचे वर्चस्व वाढले आणि ते वर्चस्व कायम ठेवण्यासाठी आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा आरंभ झाला. काही वर्षापुर्वी अमेरिकन विचारवंत फ्रान्सीस फुकुयामा यांनी `इतिहासाची अखेर` या आपल्या ग्रंथात असा विचार मांडला की, लोकशाही ही राजकीय प्रणाली व भांडवलशाही ही आर्थिक प्रणाली असल्यामुळे यास मानवी इतिहासाची अखेर असे मानावे लागेल.१ कारण या सर्वोत्कृष्ट विचार प्रणाली आहेत. इतर सर्व वैयक्तिक प्रणालीवर मात करून त्यांनी आपले वर्चस्व सिध्द केले. या प्रणालींना पर्याय राहिलेला नाही. १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धात चीनने समाजवादी मार्गाचा त्याग करून भांडवलशाहीकरणास प्रारंभ केला. १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात भारतीय अर्थव्यवस्था संकटात सापडली. १९८९ ला ९ व्या लोकसभेची निवडणूक होऊन काँग्रेस अल्पमतात जाऊन भा. ज. प. व कम्युनिष्ट पक्ष यांच्या पाठिंब्याने जनता दलाचे सरकार स्थापन झाले. व्ही. पी. सिंग पंतप्रधान झाले. भा. ज. प. ने पाठींबा काढल्यामुळे व्ही. पी. सिंग सरकार जाऊन काँग्रेसच्या पाठींब्याने चंद्रशेखर पंतप्रधान झाले. याच काळात देशाच्या परकीय कर्जामध्ये खूपच वाढ झालेली होती. कर्जाचे हप्ते भरण्यासाठी पैसा कमी पडु लागला. यातूनच जागतिक बँकेकडे सोने गहाण ठेवण्याची वेळ आली.२

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College Hingoli Dist Hingoli

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis IMPACT FACTOR 5.85 ISSN 0976-0377
Issue : XIX, Vol. I, Jan. 2019 To June 2019 

काँग्रेसने पाठींबा काढल्यामुळे चंद्रशेखर सरकार गडगडले व भारतातील राजकीय अस्थिरतेची वाटचाल सुरु झाली.

१९९१ ला १० व्या लोकसभेची निवडणूक होऊन अल्पमताने नरसिंहरावांचे सरकार स्थापन झाले. मात्र यापुर्वी १९९० नंतर भारताच्या अर्थव्यवस्थेने भयावह वळण घेतले. बेरोजगारांच्या संख्येत भर पडून १९९१ ला ३,६३,००,००० एवढी बेरोजगारी निर्माण झाली.३ सरकारी उद्योगधंद्यातील तोटा वाढतच चालला होता. नोटा छापून देशांतर्गत देणी भागवायची म्हटली तर चलन फुगवटा वाढण्याचा धोका व परकीय कर्ज फेडण्यासाठी आपल्या नोटांचा फारसा उपयोग नव्हता. कारण आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय रूपयांची घसरण सुरू होती.

**शोधनिबंधलेखनाचा उद्देश**

१. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा अभ्यास करणे.

२. जागतिकीकरणाचा शेतीक्षेत्रावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

**जागतिकीकरणाच्या अर्थ**

जागतिकीकरणाची ही प्रक्रिया आर्थिक परिणामांबरोबरच राजकीय क्षेत्रातही मुलभूत बदल करणारी ठरली आहे. जागतिकीकरणामुळे राष्ट्र ही संकल्पना लोप पावली आहे. कारण एकाच राष्ट्रात अनेक राष्ट्रांच्या हितसंबंधांचा परिणाम राजकीय निर्णयपध्दतीवर होत आहे. जागतिकीकरण म्हणजे व्यापार किंवा आर्थिकदृष्टया संपूर्ण विश्वात चालणे होय. त्यांना प्रदेश व राष्ट्राच्या मर्यादा नसतात. एक प्रकारे जागतिक अर्थव्यवस्थेशी एकात्मतेची ती प्रक्रिया आहे.

**गॅट करार**

१९९५ मध्ये ऑर्थर डंकेलने जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) माध्यमातून डंकेल प्रस्ताव मांडण्यात आला. यामध्ये प्रथमच शेती आणि शेतीव्यापार यांचा समावेश केला. यामुळे जागतिक व्यापार संघटनेच्या सभासद देशांनी जकातेत्तर निर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापारावरून काढून टाकणे, शेतीमालाच्या किमती ठरवितांना उत्पादन खर्च व इतर अडथळे दूर करणे, शेतीमालाच्या निर्यातीला प्रत्यक्ष दिल्या जाणाज्या अर्थसहाय्यात कपात करणे, याचबरोबर बौध्दिक संपदा यासारखे अधिकार मान्य केले आहेत. ऑर्थर डंकेलने अतिशय काळजीपूर्वक भाषा वापरून खुल्या बंधमुक्त, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा जवळपास ४५० पानांचा मसुदा तयार केला. हा मसुदा जसा आहे तसा कोणतेही बदल न करता स्विकारला पाहिजे, त्यासंबंधी आता कोणत्याही वाटाघाटी नाहीत आणि जर तो मान्य नसेल तर गॅटचे सदस्यत्व सोडावे लागेल असा अंतिम इशारा दिला. १५ डिसेंबर १९९३ ला डंकेल प्रस्तावाला सचिव पातळीवर मान्यता दिलेली आहे.५ या डंकेल प्रस्तावात तरतुदी अशा होत्या

१) वनस्पतींच्या नवीन जातीवर वनस्पती पैदासदारांचे हक्क

२) सूक्ष्म जीवावरील बौध्दिक संपदेचे हक्क,

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College Hingoli Dist. Hingoli

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 5.85
ISSN 0976-0377
Issue : XIX, Vol. I, Jan. 2019 To June 2019 

३) सूक्ष्म जीवशास्त्राच्या प्रतिक्रियावरील बौध्दिक संपदेचे हक्क.६

**बहुराष्ट्रीय कंपन्यांचा शेती क्षेत्रात शिरकाव**

भारतात आर्थिक सुधारणा व डंकेल प्रस्ताव मान्य केल्याने देशाच्या प्रत्येक अर्थसंकल्पात शेती, जलसिंचन, ग्रामीण विकास आणि खतावरील अनुदाने या सर्व बाबींवरील जी.डी.पी.च्या प्रमाणातील एकूण खर्चात (योजनांतर्गत आणि योजनाबाह्य) सातत्याने घट झाली. जागतिकीकरणाच्या अंमलबजावणीमुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय बाजारपेठेमध्ये शिरकाव केला आहे. यामधील कारगील सीडस, बेजो शितल सीडस्, सँडोज, पायोनियर, ओव्हर साईज, कार्पोरेशन, आय. टी. सी., ॲग्रोटेक, हिंदुस्थान लिव्हर यासारख्या बहुराष्ट्रीय कंपन्या शेतीसाठी लागणाज्या बी-बियाणांच्या बाजारात उतरल्या आहेत. एवढेच नव्हे तर अमेरिकेतील कारगिल कॉन्टीनेन्टल ग्रेन आणि युरोपमधील तीन मोठया कंपन्या अशा एकूण पाच कंपन्यांच्या हाती जगातला ८० % धान्यबाजार आहे.

अमेरिकेच्या फॉर्च्युन मासिकात नमुद केलेल्या ५०० बलाढ्य कंपन्यांचा आर्थिक व्यवहार १४ हजार अब्ज डॉलर इतका आहे. संपूर्ण जगात विकलेल्या वस्तुंच्या व सेवांच्या मुल्यांपैकी ८० % भाग त्यांच्या अखत्यारित आहे. जगातील सर्वात बलाढ्य १०० आर्थिक शक्तींमध्ये ५१ बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत तर ४९ देश आहेत.८ म्हणजेच अनेक राष्ट्रांच्या आर्थिक शक्तीपेक्षा बहुराष्ट्रीय कंपन्यांची शक्ती कित्येक पटींनी अधिक आहे. या बहुराष्ट्रीय कंपन्यांची दृष्टी सारी जागतिक बाजारपेठ म्हणून त्यांना हवे आहे. कोणत्याही राष्ट्राची सरकारे त्यांच्या नितीमध्ये कोणतीही आडकाठी आणणार नाहीत यावर त्यांचा कटाक्ष आहे. त्यांच्यामते या बाबतीत आजच्या जागतिकीकरणाच्या युगात राष्ट्राचे आर्थिक सार्वभौमत्व ही कल्पनाच कालबाह्य झाली आहे. जगातील सर्व राष्ट्रांनी मुक्त बाजारपेठेला पोषक व बहुराष्ट्रीय कंपन्यांना मान्य असलेला आर्थिक कार्यक्रमच राबवावा असा त्यांचा आग्रह आहे. या आर्थिक कार्यक्रमात पुढील बाबींचा त्यांनी समावेश केला.

१. बहुराष्ट्रीय कंपन्यांना उत्पादन व वितरणाचे संपूर्ण स्वातंत्र्य असावे. सर्व प्रकारचे परवाने रद्द करावेत किंवा कमी करावेत. बंधने काढून टाकावीत त्यासाठी कायद्यात किंवा नियमात बदल करावेत.
२. सर्व वस्तुंच्या व सेवांच्या आयात-निर्यातीवर बंधने नसावीत. आयात निर्यात कर कमीत कमी असावेत.
३. बहुराष्ट्रीय कंपनीच्या पेटंटस्वर रॉयल्टी द्यावी. रॉयल्टी न देता उत्पादनतंत्र वापरल्यास जबरदस्त दंड लावावा.
४. गुंतवणूकीवरची सर्व बंधने काढून टाकावित. एतदेशियांना उत्पादनाबरोबर तंत्रज्ञान द्यावे, एतदेशीय कंपन्यांचा सहभाग असावा. उत्पादनाचा विशिष्ट भाग निर्यात करावा.
५. एतदेशीय कारखानदारांना कोणतेही विशेष संरक्षण देऊ नये.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

६. सर्व नैसर्गिक संपत्ती भूमी, जल, वन बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पादनाला उपलब्ध असाव्यात.

७. पर्यावरण रक्षणाचे किंवा मजुरांच्या संरक्षणाचे कायदे शिथील करावेत.

८. बहुराष्ट्रीय कंपन्यांविरूध्द विरोधात्मक मोर्चे निघाल्यास बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या संपत्तीला व व्यवस्थापन वर्गाला पोलीस संरक्षण द्यावे. त्याचा खर्च बहुराष्ट्रीय कंपन्यांना द्यावा लागू नये.९

**जागतिकीकरणाचे शेतीक्षेत्रावर झालेले परिणाम**

आर्थिक सुधारणेच्या नावाने लादलेल्या अशा प्रकारच्या नवसाम्राज्यवादी अटींनी भारतीय शेतकरी आणि कामगार आजच्या परिस्थितीत बेदखल झालेला दिसून येतो. सन १९९८-९९ मधील रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या चलन आणि वित्त अहवालात नमुद करण्यात आले आहे की, खाजगी क्षेत्राच्या गुंतवणुकीचा बहुतांश भाग अल्पकालीन उत्पादकता वाढविण्यासाठी वापरला जातो. दिर्घकालीन मालमत्तेची निर्मिती करण्यासाठी नाही. यात स्पष्टपणे असेही निदर्शनास आले आहे की, शेतीच्या विकासाचे सातत्य निर्णायकपणे सार्वजनिक गुंतवणूकीवर अवलंबून असते. गेल्या कित्येक वर्षापासून शेती क्षेत्रातील घटत्या सार्वजनिक गुंतवणूकीचे भारतीय शेतीवर आणि शेतकऱ्यांवर विपरित परिणाम झालेले आहेत.

**निष्कर्ष**

प्रस्तुत शोधनिबंधाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१. आंतरराष्ट्रीय स्तरावरील राजकीय बदलाच्या पार्श्वभूमीवर उदारीकरण, जागतिकीकरण व खाजगीकरणाचा पुरस्कार भारतामध्ये केला.

२. तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या निर्णयानुसार नवीन आर्थिक धोरण मान्य करण्यात आले.

३. भारतात आर्थिक सुधारणा व डंकेल प्रस्ताव मान्य केल्याने देशाच्या प्रत्येक अर्थसंकल्पात शेती, जलसिंचन, ग्रामीण विकास आणि खतावरील अनुदाने या सर्व बाबींवरील जी.डी.पी.च्या प्रमाणातील एकूण खर्चात (योजनांतर्गत आणि योजनाबाह्य) सातत्याने घट झाली.

४. शेती क्षेत्रातील घटत्या सार्वजनिक गुंतवणूकीचे भारतीय शेतीवर आणि शेतकऱ्यांवर विपरित परिणाम झालेले आहेत.

५. केंद्र सरकारने १९९१ नंतर पाणी, खते, वीज इत्यादीकरीता शेतकऱ्यांना दिली जाणारी अनुदाने (सबसिडी) कमी केली आहेत.

**सारांश**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे समाजात सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक बदल

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli.

झाले आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा भारतीय राजकीय व्यवस्थेसमोरील एक ज्वलंत समस्येचा विषय आहे. शिवाय लाउशीप, कायदा व कृषी कार्यक्रमाचा आहे. यामुळे जागतिकीकरणाने खुली बाजारपेठ व खाजगीकरण यांच्यामार्फत मानवाला नवीन साधने, व्यापक पर्याय देण्याचे मानवी समाजाचा विकास करण्याचे जरी आश्वासन दिले असले तरी या जागतिकीकरणामुळे जगातील विकसनशील देशात आलेली संकट शेतकरी व कामगारांना दारिद्र्याच्या खाईत लोटणारी आहेत हे दिसुन येत आहे. किंबहुना ही नवीन उदारमतवादी अर्थप्रणाली भारतीय शासन आणि राजकारणाला पर्याय देवू शकणार नाही.

## संदर्भ सूची :-


१. कराडे, जगन (२००८), (संपादक),जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लीकेशन, पुणे,प्रथमावृत्ती जानेवारी पृ. ९८

२. मोरे विठ्ठल व संपादक मंडळ, विचारमंथन 'जागतिकीकरण' महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका, फेब्रुवारी २००२, अंक पहिला, पृ. क्र. २४

३. कराडे, जगन (२००८),(संपादक),जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लीकेशन, पुणे,प्रथमावृत्ती जानेवारी.९९

४. दुनाखी,पद्माकर.,(२००६),जागतिकीकरण,उदारीकरण आणि अर्थकारण, पुणे, श्रीविद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती,६४

५. मोरे, विठ्ठल., व संपादक मंडळ, विचारमंथन 'जागतिकीकरण' महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका, फेब्रुवारी २००२, अंक पहिला, पृ. क्र. २४

६. कराडे,जगन., (२००८), (संपादक),जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लीकेशन, पुणे,प्रथमावृत्ती जानेवारी.९९

७. कराडे,जगन., (२००८), (संपादक),जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लीकेशन, पुणे,प्रथमावृत्ती जानेवारी.१०१

८. दुनाखी,पद्माकर.,(२००६),जागतिकीकरण,उदारीकरण आणि अर्थकारण, पुणे, श्रीविद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती,६५

९. दुनाखी,पद्माकर., (२००६),जागतिकीकरण,उदारीकरणआणि अर्थकारण, पुणे, श्रीविद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती,६६

१०. कराडे,जगन.,(२००८),(संपादक),जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लीकेशन, पुणे,प्रथमावृत्ती जानेवारी.१०३


PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli